**ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय ग्रंथालये व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना सार्वजनिक सेवा हा वीजदर आकारण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ०२३**

परिपत्रक क्र.३२/२०१२-१३/१३००९-६५ दिनांक: ३१ जानेवारी, २०१३

---

**परिपत्रक :-**

मा.मुख्य अभियंता(वाणिज्य), **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१ यांचे पत्र क्र.पी-आर-३/टॅरीफ/१८४५ दिनांक : १८ जानेवारी, २०१३** ची प्रत सोबत जोडली आहे.

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आतापर्यंत वाणिज्य दराने वीज देयके अदा करीत होती. राज्यातील ही सर्व ग्रंथालये **जनहितार्थ व समाजप्रबोधनाचे कार्य करीत आहेत**. ही ग्रंथालये व्यापारी हेतुसाठी नसून या ग्रंथालयांकडून सार्वजनिक सेवा दिली जाते. त्यामुळे या ग्रंथालयांना शैक्षणिक संस्था वा जनहितार्थ सार्वजनिक सेवा देणाऱ्या संस्था मानून विद्युत बील आकारण्यात सवलत देण्याबाबत ग्रंथालय संचालनालयाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना विनंती केली होती.

वीज नियामक आयोगाने दिनांक १६.०८.२०१२ च्या आदेशान्वये **'सार्वजनिक सेवा'** ही नवीन वर्गवारी निर्माण केलेली आहे. या वर्गवारीमध्ये उच्चदाब व लघुदाब यामध्ये **नवीन 'सार्वजनिक सेवा' वर्गवारीमध्ये ग्रंथालय अथवा वाचनालय यांचा समावेश केलेला आहे**. त्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी **वाणिज्य परिपत्रक क्रमांक १७५ दिनांक ०५.०९.२०१२** अन्वये सदर बाब त्यांच्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविलेली आहे.

मा.मुख्य अभियंता (वाणिज्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१ यांनी उपरोक्त पत्रान्वये **ग्रंथालय किंवा वाचनालय सार्वजनिक सेवेमध्ये मोडत असल्यामुळे सदर संस्थेला माननीय वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार "लघुदाब-१० सार्वजनिक सेवा" अथवा "उच्चदाब-९ सार्वजनिक सेवा" या वर्गवारीप्रमाणे वीज दर आकारण्यात यावे**. अशा सूचना सर्व अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.म., सं.व सु. मंडल कार्यालय यांना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने सर्व शासकीय व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्याशी संबंधीत विद्युत कार्यालयात विहित नमुन्यातील फॉर्म भरुन ग्रंथालयाचे वीज दर आकार बदलून घेऊन या सवलतीचा लाभ घ्यावा.

**(डॉ. बा. ए. सनान्से)**
प्र.ग्रंथालय संचालक,
ग्रंथालय संचालनालय,
महाराष्ट्र राज्य.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

2012-13/M.S.E.B.Letter.doc

महावितरण (TM)

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२ २६४७६२३३, २६४७२३१८

क्र. पी-आर-३/ टॅरीफ / 1845 दिनांक : 18 JAN 2013

ग्रंथालय संचालनालय
म. राज्य, मुंबई 90८90
आवक क्रमांक 22/1/13
दिनांक
कार्या 3

प्रति,
**सर्व अधीक्षक अभियंता,**
म.रा.वि.वि.कं.म.,
सं.व सु. मंडल कार्यालय.

**विषय :- महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय ग्रंथालये व शासन मान्य सार्वजनिक ग्रंथालयांना सार्वजनिक सेवा हा वीजदर आकारण्याबाबत.**

**संदर्भ :-** ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ३२/२०१२-२३/११८३४ -३५ दिनांक १४.०१.२०१३.

ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे संदर्भातील पत्र या कार्यालयास प्राप्त झाले. सदर बाबतीत ग्रंथालय संचालनालय यांचे असे म्हणणे आहे की, राज्यातील शासकीय व शासन मान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून जनतेस ग्रंथालयीन सेवा देण्यांत येते. या सेवेचा लाभ अभ्यासक, संशोधक, शास्त्रज्ञ, वकील, प्राध्यापक व तमाम वाचकांना घेता येतो. राज्यातील ही सर्व ग्रंथालये जनहितार्थ व समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहेत. ही ग्रंथालये व्यापारी हेतूसाठी नसून याद्वारे सार्वजनिक सेवा दिली जाते. त्यामुळे या ग्रंथालयांना जनहितार्थ सार्वजनिक सेवा देणाऱ्या संस्था मानून त्यांना विद्युत देयके आकारण्यांत यावीत, अशी विनंती ग्रंथालय संचालनालय यांनी केलेली आहे.

याबाबत, असे स्पष्ट करण्यांत येते की, माननीय आयोगाने त्यांचे वीजदर आदेश दिनांक १६.०८.२०१२ अन्वये "सार्वजनिक सेवा" ही नवीन वर्गवारी निर्माण केलेली आहे. या उच्चदाब व लघुदाबरील नविन "सार्वजनिक सेवा" वर्गवारीमध्ये ग्रंथालय अथवा वाचनालय यांचा समावेश करण्यांत आलेला आहे. वाणिज्य परिपत्रक क्रमांक १७५ दिनांक ०५/०९/२०१२ अन्वये सदर बाब सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यांत आलेली आहे.

सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यांत येते की, ग्रंथालय किंवा वाचनालय सार्वजनिक सेवेमध्ये मोडत असल्यामुळे सदर संस्थेला माननीय वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार, "लघुदाब - १० सार्वजनिक सेवा" अथवा "उच्चदाब - ९ सार्वजनिक सेवा" या वर्गवारी प्रमाणे वीज दर आकारण्यांत यावे.

प्र-संचालक
29/1/13
कार्या-3
प्रसंचालक

डॉ. ३. सो. देवे
मुख्य अभियंता (वाणिज्य)

**प्रत सविनय सादर :-**
१) कार्यकारी संचालक (वाणिज्य), म.रा.वि.वि.कं.म., सांघिक कार्यालय, मुंबई.
२) डॉ. बा. ए. सनान्से, प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचलनालय, महाराष्ट्र शासन, नगर भवन-मुंबई-४०००२३.

D:\RBB\Tariff\Marathi\Granthalaya.doc